

ताराराणी विद्यापीठाच्यावतीने नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर याना 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' प्रदान करताना प्रेस कौन्सिलचे अध्यक्ष व सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत. सोबत छायाचित्रात श्री. आर. के. कणबरकर व सौ. सावंत. (वृत्त पान ३ वर) (छाया- मोहन मेस्त्री)

# 'नर्मदा बचाव' आंदोलनास सर्वांनी साथ द्यावी

## मेधा पाटकर यांचे आवाहन

कोल्हापूर, दि. १७ (प्रतिनिधी)- 'नर्मदा प्रश्न हा तेथील आदिवासी समाजापुरताच मर्यादित नसून तो खोट्या विकास संकल्पनेचा, भविष्याचा असल्याने नर्मदा बचाव आंदोलनाची व्याप्ती वाढविण्यासाठी या आंदोलनाला सर्वांनी साथ द्यावी,' असे आवाहन 'नर्मदा बचाव' आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांनी आज येथे केले. स्त्रीमुक्तीचा आरडाओरड करण्यापेक्षा स्त्रियांनी संवेदनशील मनाला जागृत करावे, असेही त्या म्हणाल्या.

ताराराणी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सव शुभारंभ आणि 'भद्रकाली ताराराणी' पुरस्कार प्रदान समारंभप्रसंगी मेधा पाटकर बोलत होत्या. ताराराणी विद्यापीठाच्यावतीने देण्यात येणारा भद्रकाली ताराराणी पुरस्कार मेधा पाटकर यांना सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष पी. बी. सावंत यांच्या हस्ते प्रदान करून सत्कार करण्यात आला. मानचिन्ह व रोख अकरा हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्रीमती पाटकर पुढे म्हणाल्या की, पुरोगामी मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील संस्था, कामगार व तरुणांनी कर्तव्याची भावना मनात ठेवून आंदोलनात सहभागी व्हावे. त्या म्हणाल्या, 'औपचारिक शिक्षणामुळे व्यक्तिमत्व विकासाची संकल्पना कागदावरच राहत असल्याने चार भिंतीबाहेर मनावर बिंबविल्या जाणाऱ्या संस्कारांची शहनिशा करण्याची गरज आहे. उपभोगवाद, चंगळवाद यांची त्या म्हणाल्या की, स्त्रीमुक्तीसाठी महिलांत व्यापक जागृतीची गरज असून स्त्रियांनी त्यामध्ये पुढाकार घ्यावा. समाज एक करण्याची ताकद असलेल्या स्त्रियांनी चूल आणि मूल या पलिकडच्या विश्वात भरारी मारावी.

'शरीर नको मन वाढवून घ्या,' असे आवाहन करून त्या म्हणाल्या की, श्रमाच्या भांडवलाला इथे किंमत नाही, आर्थिक भांडवलाच्या जोरावर जे अमानवी राजकारण चालू आहे ते थांबण्याची गरज आहे. कोणताही उद्योग म्हणजे विकास नव्हे.

रोजगार हमी योजना किंवा किमान वेतन कायदा करून सर्वांना काम आणि दाम मिळत नाही, असे सांगून देशातील सर्व विनाशकारी प्रकल्प ताबडतोब थांबवावेत अशी मागणीही त्यांनी शेवटी केली.

माजी न्या. पी. बी. सावंत म्हणाले की, महात्मा फुल्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली त्यांचा वारसा चालविणाऱ्यांमध्ये व्ही. टी. पाटील यांचे नाव घ्यावे लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीशिक्षणाची कल्पनासुध्दा कठीण वाटत होती अशा काळात काकांनी शिक्षणसंस्था उभारली हे फार मोलाचे कार्य त्यांनी केले.

स्त्रियांनी सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणाऱ्या ताराराणी विद्यापीठाचे कौतुकही श्री. सावंत यांनी आपल्या भाषणात केले.

प्रारंभी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर यांनी या कार्यकर्त्यांने आपल्या भाषणात नर्मदा बचाव आंदोलनाची व्याप्ती वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी आमदार सुरेश साळुंखे, सौ. सावंत, अनेक मान्यवर, ताराराणी विद्यापीठाचे शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.